संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-20

30 MAY 2024

प्राप्त झाले सही....................

सक्तीचा प्रतिक्षाधिन कालावधी मंजूर करणेबाबत.
श्री.भागवत मच्छिंद्र मुरकुटे,सहसंचालक.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग,**

शासन आदेश:-संलेको-२०२४/प्र.क्र.२४/कोषा प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २७ मे, २०२४.

<u>संदर्भ</u>:- १) सहसंचालक (प्रशासन), लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.संलेवको /प्रशा-राप/का-६/ श्री.मुरकुटे/०१.२४/६८/२२४/३१३, दि.१७.०१.२०२४,
२) सामान्य प्रशासन विभाग यांचे आदेश क्र. एमआरएन-१२२२/प्र.क्र.१७७/का-२१,दि.३०.०६.२०२२,
३) सहसंचालक, लेखा व कोषागारे, संचालनालय,मुंबई यांचे आदेश क्र.संलेको/रोख/कार्या-१/ प्रतिक्षाधिन अधिकारी/२०२२/४९८, दि.१३.०७.२०२२
४) संचालक, संचालनालय,लेखा व कोषागारे,मुंबई यांचे आदेश क्र.संलेवको/प्रशा-राप/का-६/ रजा मंजूरी/श्री.मुरकुटे/०१.२४/६१,दि.१६.०१.२०२४
५) सामान्य प्रशासन विभाग यांचे आदेश क्र .एमआरएन/१२२२-प्र.क्र.२२०(भाग-१३)/२१- आस्था, दि.०८.०५.२०२३,

**-: <u>शासन आदेश</u> :-**

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र.२ दि.३०.०६.२०२२ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये मा.मुख्यमंत्री महोदय व त्यांचे मंत्री परिषदेतील मा.उपमुख्यमंत्री/मंत्री/राज्यमंत्री यांचे कार्यालयीन आस्थापनेवरील मंत्रीमंडळाच्या कालावधीकरीता निर्माण करण्यात आलेली सावधि पदे संपुष्टात आली. त्याअनुषंगाने, सहसंचालक संवर्गातील श्री.भागवत मच्छिंद्र मुरकुटे, खाजगी सचिव, मा.मंत्री,वस्त्रोद्योग,मत्स्यव्यवसाय,बंदरे यांची सेवा दि. ३०.०६.२०२२ (म.नं.) पासून समाप्त करण्यात आली.

२. शासन परिपत्रक दि.२०.०२.२००८ मधील तरतूदीनुसार श्री.मुरकुटे हे पदस्थानेच्या प्रतिक्षेत असल्याने दि.०१.०७.२०२२ (म.पू.) पासून संदर्भ क्र.३ अन्वये संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई या कार्यालयात हजर झाले. दरम्यान श्री.मुरकुटे यांची सेवा उपयोगात आणणे आवश्यक असल्याने त्यांना संचालनालयातील सहसंचालक (संगणक) शाखेचे कामकाज सोपविण्यात आले.

३. दरम्यान श्री.मुरकुटे कौटुंबिक कारणास्तव दि.०४.०७.२०२२ ते दि.०४.१०.२०२२ या कालावधीत ९३ दिवस अर्जित रजेवर होते. सदर कालावधीतील रजा संचालनालयाने संदर्भ क्र.४ च्या आदेशान्वये मंजूर केलेली आहे.

४. सामान्य प्रशासन विभाग यांचे, संदर्भ क्र.५ दि ०८.०५.२०२३.रोजीचे पत्रान्वये श्री मुरकुटे.यांची नियुक्ती प्रतिनियुक्तीने खाजगी सचिव म्हणुन मा.मंत्री, रोजगार हमी व फलोत्पादन ,श्री.संदिपानजी भुमरे यांच्या कार्यालयीन आस्थापनेवर दि.०६.१०.२०२२ (म.पू.) रोजी पासून करण्यात आली.

५. श्री.मुरकुटे यांचा नियमित करावयाचा प्रतिक्षाधीन कालावधी पुढीलप्रमाणे आहे :

| अ.क्र. | कालावधी | एकूण दिवस | शेरा |
|---|---|---|---|
| १ | दि.०१.०७.२०२२ | ०१ दिवस | नियमित करावयाचा प्रतिक्षाधिन कालावधी |

श्री. तरल 31/05

661/2024/961
30/05/2024

D:\gaurav dande\सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी\श्री.मुरकुटे १.docx

६.	यास्तव, **म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ च्या नियम ९ (१४) (फ)** मधील तरतूदींच्या अधीन राहून, सहसंचालक संवर्गातील श्री.मुरकुटे दि.०१.०७.२०२२ या ०१ दिवसाच्या प्रतिक्षाधीन कालावधीचे व लगतनंतर दि.०२ व ०३.०७.२०२२ रोजीची साप्ताहिक सुट्टी, दि.०४.०७.२०२२ ते दि.०४.१०.२०२२ या ९३ दिवस मंजूर रजा कालावधी तसेच दि.०५.१०.२०२२ रोजीच्या सार्वजनिक सुट्टीसह **दि.०१.०७.२०२२ ते दि.०५.१०.२०२२ पर्यंत ९७ दिवसांच्या** नियमित करावयाच्या कालावधीचे वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता **अवर सचिव (रोख ), सामान्य प्रशासन विभाग-२१,मंत्रालय,मुंबई** यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(ता.र.पवार)**
**अवर सचिव,वित्त विभाग.**

प्रत :-

१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२) महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,*
३) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,*
४) सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
५) अवर सचिव (रोख),सामान्य प्रशासन विभाग-२१,मंत्रालय,मुंबई ,*
६) श्री.भागवत मच्छिंद्र मुरकुटे, सहसंचालक, *
७) मा.मंत्री,रोजगार हमी व फलोत्पादन यांचे कार्यालय,मंत्रालय,मुंबई,*
८) निवड नस्ती, कोषा प्रशा -२,
*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)